शासन ज्ञापन क्रमांक- जमीन-२६०६/प्र.क्र. २६५२/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २० सप्टेंबर, २००६

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मुंबई उपनगर जिल्हयात क्रिडा संकुल उभारण्यासाठी मौजे कोंदिवटा ता. अंधेरी, न. भू. क्र. १६७ पै मधील ४,००० चौ. मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ, ता. अंधेरी, न. भू. क्र. ४३२ पै मधील ७,००० चौ. मी. क्षेत्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करणे बाबत...

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी/कार्या-२ अ/क्रिडा संकुल/कावि-१७७/२००६, दिनांक १/३/२००६, पत्र क्रमांक -सी/कार्या-३ क/कावि-८६/२००६, दिनांक ४/४/२००६ व पत्र क्रमांक- सी/कार्या-३ क/कावि-८६ /२००६, दिनांक २७/४/२००६ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्याचे क्रिडा धोरण २००१ नुसार महाराष्ट्र स्पोर्टस इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत क्रिडा सुविधा निर्मीतीबाबत शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- राक्रीधो-२००३/प्र.क्र. १३/क्रीयुसे, दिनांक २६/३/२००३ अन्वये मुंबई उपनगर जिल्हयासाठी एक विभागीय क्रिडा संकूल उभारण्यास मान्यता देण्यात आलेली असून त्यानुसार मुंबई उपनगर जिल्हयाकरीता जिल्हा क्रिडा संकूल उभारण्यासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना मुंबई उपनगर जिल्हयात शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता पुढीलप्रमाणे प्रस्तावास शासन मंजुरी देत आहे.

२. मौजे कोंदिवटा ता. अंधेरी, न. भू. क्र. १६७ येथील जमिनीचे एकुण क्षेत्र १२,२६८ चौ. मी. क्षेत्रापैकी ४,००० चौ. मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ, ता. अंधेरी, न. भू. क्र. ४३२ येथील एकूण १४,१७०.१० चौ. मी. क्षेत्रापैकी ७,००० चौ. मी. क्षेत्र अशी एकूण ११,००० चौ. मी. जमीन, मुंबई उपनगर जिल्हयाकरीता क्रिडा संकूल उभारण्यासाठी म... जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ५ व ६ मधील त... नुसार तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक-जमीन-१०/२००५/प्र.क्र. ३८/ज-१, दिनांक ७/३/२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, खालील अटींवर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून घालण्यात येणा-या इतर अटी व शर्तीवर, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे नावे करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अटी- १) सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर अनुज्ञेय राहील.

२) सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या परवानगीशिवाय विक्री/हस्तांतरण करता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही.

३) जमिन मंजूरीतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास जमीन, त्यावरील बांधकामासह, शासनाकडे वर्ग होण्यास पात्र होईल व त्या बदल्यात कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

४) उपरोक्त जमिनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम २३ (i) (g) (ii) नुसार जलतरण तलाव व विविध खेळांसह एकूण क्षेत्राच्या कमाल १५% बांधकाम क्षेत्राचे मर्यादित पेव्हेलिअन, जिम्नॅशियम, क्लब हाऊस तसेच मनोरंजनात्मक व अन्य क्रिडा प्रकारासाठी बांधकामे अनुज्ञेय होतील.

३. सदर जमिनीचा ताबा जिल्हा क्रिडा अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. सदरचे ज्ञापन, नगर विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या सहमतीने त्या विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्रमांक अनुक्रमे ४३१, दिनांक ६/७/२००६ व निरंक दिनांक २५/७/२००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(स्वाक्षरी)
(वि. सि. वखारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पुर्व), मुंबई-५१

प्रतिलिपी

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) संचालक, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) जिल्हा क्रिडा अधिकारी, मुंबई उपनगर, शासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय परिसर, आकुर्ली रोड, कांदिवली, मुंबई.
५) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
६) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा
७) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

C:\VILAS DHAUE/SPORT GROUND/6

3 DEC 2009
2 DEC 2009
24520
III-C

क्रमांक- जमीन-२६०६/प्र.क्र.२६५२/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २७ नोव्हेंबर, २००९

विषय :- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कोंदिवटा, नभूक्र १६७ मधील १२२६८.९० चौ.मी.
व मौजे मरोळ, नभूक्र.४३२ मधील १४४७०.१० चौ.मी.
क्षेत्र जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करण्यास
परवानगी देणेबाबत.

पहा:- शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२६०६/प्र.क्र.२६५२/ज-३,
दिनांक २०/०९/२००६

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्र.०२/२०/३ क/एफ-२७४, दिनांक ३१/१०/२००६, क्र ०२/२०/३ क/एफ-२७४, दिनांक १८/१०/२००७, क्र.०२/२०/३ क/ एफ-२७४, दिनांक २७/०२/२००८ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे कोंदिवटा, नभूक्र.१६७ मधील ४००० चौ.मी.क्षेत्र तसेच मौजे मरोळ, ता.अंधेरी, नभूक्र.४३२ मधील ६००० चौ.मी. क्षेत्र जिल्हा क्रीडा संकुल उभारण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागास प्रदान करण्याबाबत या विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले शासन ज्ञापन क्र.जमीन-२६०६/ प्र.क्र.२६५२/ज-३, दिनांक २०/०९/२००६ अधिक्रमित करुन, मौजे कोंदिवटा, नभूक्र.१६७ मधील १२२६८.९० चौ.मी.क्षेत्र तसेच मौजे मरोळ, ता.अंधेरी: नभूक्र.४३२ मधील १४४७०.१० चौ.मी. क्षेत्र असे एकूण २६७३९ चौ.मी. क्षेत्र, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींचे वितरण) नियम, १९७१ च्या नियम-५ व ६ मधील तरतुदीनुसार तसेच खालीलप्रमाणे अटी व शर्तीवर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून घालण्यात येणा-या इतर अटी व शर्तीवर "जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती, मुंबई उपनगर जिल्हा" यांचे नावे करण्यास /हस्तांतरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अटी:- (१) सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर अनुज्ञेय राहील.

(२) सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या परवानगीशिवाय विक्री/हस्तांतरण करता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही.

(३) जमीन मंजूरीतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास जमीन, त्यावरील बांधकामासह, शासनाकडे वर्ग होण्यास पात्र होईल व त्या बदल्यात कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

(४) बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र.२३(i)(g)(ii) नुसार जलतरण तलाव व विविध खेळांसह एकूण क्षेत्राच्या कमाल १५% बांधकाम क्षेत्राच्या मर्यादेत पॅव्हेलियन, जिम्नॅशियम क्लब हाऊस तसेच मनोरंजनात्मक व अन्य क्रीडा प्रकारासाठी बांधकामे अनुज्ञेय होतील.

(११)

(५) मौ.कोंदिवटा, नभूक्र.१३७ व मौ.मरोळ, ता.अंधेरी, नभूक्र.४३२ मधील जमिनी पुनर्रचित मंजूर विकास योजनेनुसार अनुक्रमे क्रिडांगण व मनोरंजनाचे मैदान यासाठी आरक्षित असल्याने व जागेचा परिसर विशेष औद्योगिक विभाग (आय-३) मध्ये समाविष्ट असल्याने विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.९, टेबल क्र.४ खालील तळटीप क्र.(iv) नुसार क्रिडांगणाच्या/ मनोरंजनाच्या मैदानाच्या १०% क्षेत्रावर एकूण क्षेत्राच्या १५ टक्के बांधकाम तत्सम उपयोगासाठी अनुज्ञेय राहील. विषयांकीत जमिनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार टीडीआर अनुज्ञेय नाही. संरक्षणपात्र अतिक्रमणधारकांचे नियम क्र.३.११ खाली अन्यत्र स्थलांतरण/पुनर्वसन केल्यावर नियमाच्या तरतुदीनुसार टीडीआर अनुज्ञेय होऊ शकेल.

(६) राज्य क्रीडा धोरणांतर्गत क्रीडा सुविधा संकुल उभारण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा क्रीडा संकुलाची उभारणी करणे आवश्यक आहे.

(७) सदर प्रकल्प अत्यावश्यक नागरी प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला असल्याने विषयांकीत जमिनीवरील संरक्षणपात्र अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनाबाबत कार्यवाही झाल्यानंतर क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात यावे.

२. सदरचे ज्ञापन नगरविकास विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे १३५/०९/युडी-११, दिनांक २२/०५/२००९ व क्र.३५८/०९/व्यय-९, दिनांक ०२/०९/२००९ नुसार तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि गृहनिर्माण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( राजेंद्र सुर्वे )
उपसचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

**प्रतिलिपी-**

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक, क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

D:\SEEMA\Orders\Jilha Krida Sankul

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू.), मुंबई-५१.**

Ph. 26556799,26557807 Fax : 26556805 email address:-collrmsd@yahoo.com


क्र.०२/२०/२क्रीडा-२६८
दि. २६/२/०८

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे कोंदीवटा ता. अंधेरी न.भू.क्र. १६७ व मौजे मरोळ ता.अंधेरी न.भू.क्र.४३२ पैकी जिल्हा क्रीडा संकूल उभारणेसाठी आरक्षण बदलणे बाबत...

महोदय,

मौजे कोंदीवटा ता. अंधेरी येथील न. भू. क्र. १६७ जमीनीचे एकूण क्षेत्र १२२६८.९० चौ. मी. क्षेत्रापैकी ४००० चौ.मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ ता. अंधेरी येथील न. भू. क्र. ४३२ जमिनीचे एकूण क्षेत्र १४४७०.१० चौ. मी. क्षेत्रापैकी ७००० चौ. मी. असे एकूण ११००० चौ. मी. शासकीय जमीन मुंबई उपनगर जिल्हा करीता क्रीडा संकूल उभारणीसाठी शासन ज्ञापन क्र.जमीन-२६०६/प्र.क्र.२६५२ ज-३ दिनांक. २०.९.०६ निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.५.१०.०६ च्या अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

तसेच उपरोक्त जमीनीवर सदरच्या सुविधा तयार होवू शकणार नसल्याने दोन्ही जागेवरील दोन्ही जागेवरील उर्वरीत क्षेत्र मौजे कोंदीवटा ता. अंधेरी येथील न. भू. क्र. १६७ जमीनीचे एकूण क्षेत्र १२२६८.९० चौ.मी. क्षेत्रापैकी ८,२६८.९० चौ.मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ ता. अंधेरी येथील न. भू. क्र. ४३२ जमिनीचे एकूण क्षेत्र १४४७०.१० चौ.मी. क्षेत्रापैकी ७७७०.१० चौ.मी.असे एकूण १६०३९ चौ.मी.जागेची मागणीही जिल्हा क्रीडा संकुल समिती मार्फत शासनाकडे करण्यात आलेली आहे.

मौजे मरोळ ता. अंधेरी न. भू. क्र. ४३२ मधील जागेत २०० मी. चा धावणमार्ग, प्रेक्षक गॅलरी, कबड्डी-खो-खो, फुटबॉल, अद्ययावत व्यायामशाळा, क्रीडा वसतीगृह, स्क्वॅश कोर्ट, ज्यूदो कराटे खेळांसाठी हॉल या सुविधा तर मौजे कोंदीवटा ता. अंधेरी येथील न. भू. क्र. १६७ मधील जागेत जलतरण तलाव, कबड्डी-खो-खो, व्हॉलिबॉल, खुले प्रेक्षागृह, बहुउद्देशिय हॉल इ. सुविधा सदर जागेवर तयार करणेत येणार आहे.

मौजे मरोळ ता. अंधेरी न. भू. क्र. ४३२ चे आरक्षण रिक्रीएशन ग्राउन्ड (आर. जी.) म्हणून नगर विकास आराखड्यात आरक्षित करण्यात आले असून त्यानुसार उपलब्ध क्षेत्रात क्रीडा संकुल विकसित करणे दुरापास्त असल्याने सदरचे आरक्षण हे रिक्रीएशन ग्राउन्ड (आर. जी.) मधून प्ले ग्राउन्ड (पी. जी.) करण्यात आल्यास क्रीडा विषयक सुविधा जास्त प्रमाणात करता येणे शक्य आहे.

वरील दोन्ही जागेवर असणारी संरक्षित अतिक्रमणे याच परिसरात उपलब्ध असलेल्या जागेवर एस. आर. ए. स्किममध्ये स्थलांतरीत करण्यासाठी आवश्यक तेवढे एफ. एस. आय. ची तरतूद केल्यास संबंधितांना सदर जागेवर सामावून घेणे शक्य होईल.

तरी कृपया सदरचे रिक्रीएशन ग्राउन्ड (आर. जी.) आरक्षण बदलून प्ले ग्राउन्ड (पी. जी.) साठी सदरचे क्षेत्र आरक्षित करण्याबाबत निर्णय अपेक्षित आहे.

आपला विश्वासू,

O/c (सही)

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

LHA KARIDA SANKUL. २००७-०८

# ल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्र: ०२/२०/३क/एफ-२४७
दिनांक : ०५ /०१/२०१०

वाचले :- १) शासन, महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्र. जमीन /२६०६/ प्र.क्र. २६५२/ज-३ दि. २०/०९/०६.
२) कार्यालयीन सम क्र. दिनांक ०५/१०/०६ चा आदेश.
३) शासन, महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्र. जमीन /२६०६/ प्र.क्र. २६५२/ज-३ दि. २७/११/०९.

आदेश :-

मौजे कोंडीवटा, ता.अंधेरी येथील, न.भू.क्र.१६७ या जमिनीचे एकूण क्षेत्र १२२६८.९० चौ.मी. क्षेत्रापैकी ४००० चौ.मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ, ता.अंधेरी येथील न.भू.क्र.४३२ या जमिनीचे एकूण क्षेत्र १४४७०.१० चौ.मी. क्षेत्रापैकी ७००० चौ.मी. क्षेत्र असे एकूण ११००० चौ.मी. क्षेत्र हि शासकिय जमिन मुंबई उपनगर जिल्हा क्रिडा संकुल उभारण्यासाठी शासन ज्ञापन क्र.जमिन/२६०६/प्र.क्र.२६५२/ज-३ दि.२०/९/२००६ च्या निर्देशानुसार इकडील सम क्रमांकाच्या दि.५/१०/२००६ च्या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांनी या दोन्ही मिळकतीचा ताबा देवून मिळकत पत्रिकेवर प्रदान क्षेत्रासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे नाव दाखल केलेले आहे.

नियोजित जिल्हा क्रिडा संकुलाच्या मौजे कोंदीवटा, ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१६७ पै ४००० चौ.मी. प्रदान क्षेत्रावर जलतरण तलाव, कब्बडी, खो-खो, हॉलिबॉल, खुले प्रेक्षागृह, मल्टीपरपज हॉल इतर व मौजे मरोळ, ता.अंधेरी येथील न.भू.क्र.४३२ पैकी ७००० चौ.मी. प्रदान क्षेत्रावर २०० मीटरचा धावण मार्ग, प्रेक्षक गॅलरी व कब्बडी, खो-खो, फुटबॉल, अद्यावत व्यायाम शाळ, क्रिडा वसतिगृह, स्वकॅश कोर्ट, ज्युदो कराटे खेळासाठी हॉल या सुविधा करावयाच्या असल्याने क्रिडा संकुलासाठी वर्ग करण्यात आलेली जमिन अपुरी पडत असल्याने मौजे कोंडीवटा, ता.अंधेरी येथील, न.भू.क्र.१६७ पै. क्षेत्र ७७७०.१० चौ.मी. व मौजे मरोळ न.भू.क्र.४३२ पै ८२६८.९० चौ.मी. ही शिल्लक राहिलेली जमिन क्रिडा संकुलासाठी प्रदान करण्याबाबत त्यांच्या विनंतीनुसार इकडील सम क्र. दि.३१/१०/२००६, १८/१०/२००७ व २७/०२/०८ च्या पत्रान्वये शासन, महसूल व वन विभागास सविस्तर अहवाल सादर केलेला होता.

उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने मौजे कोदिविटा, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र १६७ मधील ४००० चौ.मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र. ४३२ मधील ७००० चौ.मी. क्षेत्र जिल्हा

क्रिडा संकुल उभारण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागास प्रदान करणेबाबतचे शासन, महसुल व वनविभागाकडून निर्गमित करण्यात आलेले शासन ज्ञापन क्र.जमीन -२६०६/ प्र.क्र. २६५२/ज-३, दिनांक २०/०९/२००६ उपोदघातातील अनुक्रमांक ३ च्या ज्ञापनान्वये अधिक्रमित केल्याने व या कार्यालयास दिलेल्या निर्देशानुसार मौजे कोंदिविटा, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र. १६७ चे एकूण मिळकत पत्रिकेप्रमाणे १२२६८.९० चौ.मी. क्षेत्र तसेच मौजे मरोळ, तालुका अंधेरी न.भू.क्र. ४३२ चे एकूण मिळकत पत्रिकेप्रमाणे १४४७०.१० चौ.मी. क्षेत्र असे एकूण २६७३९ चौ.मी. क्षेत्र, महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम -५ व ६ मधील तरतुदीनुसार तसेच खालीलप्रमाणे अटी शर्तीवर "जिल्हा क्रिडा संकुल कार्यकारी समिती, मुंबई उपनगर जिल्हा" यांचे नांवे करण्यास /हस्तांतरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांनी मौजे कोंदिविटा, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र. १६७ या मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर व मौजे मरोळ तालुका अंधेरी येथील न.भू.क्र. ४३२ या मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर दाखल केलेले शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे नांव रद्द करुन त्याऐवजी सदर दोन्ही मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर संपूर्ण क्षेत्रासाठी धारक म्हणून जिल्हा क्रिडा संकुल कार्यकारी समिती मुंबई उपनगर जिल्हा भोगवटदार वर्ग-२ असे नांव दाखल करावे व सदर दोन्ही मिळकतीचा ताबा जिल्हा क्रिडा संकुल कार्यकारी समिती , मुंबई उपनगर जिल्हा यांना सुपूर्द करावा.

**अटी / शर्ती :**

१) सदर जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर अनुज्ञेय राहील.

२) सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या परवानगी शिवाय / हस्तांतरण करता येणार नाही किंवा गहाण ठेवता येणार नाही.

३) जमीन मंजूरीतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास जमीन, त्यावरील बांधकामासह, शासनाकडे वर्ग होण्यास पात्र होईल व त्या बदल्यात कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

४) बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र. २३(i)(g)(ii) नुसार जलतरण तलाव व विविध खेळासह एकूण क्षेत्राच्या कमाल १५% बांधकाम मर्यादेत पॅव्हेलियन, जिम्नॅशियम क्लब हाऊस तसेच मनोरंजनात्मक व अन्य क्रिडा प्रकारासाठी बांधकामे अनुज्ञेय होतील.



D:\3c\F

(५३)

५) मौजे कोदिवटा, न.भू.क्र. १३७ व मौजे मरोळ, तालुका अंधेरी न.भू.क्र. ४३२ मधील जमीन पुनर्रचित मंजूर विकास योजनेनुसार अनुक्रमे क्रिडांगण व मनोरंजनाचे मैदान यासाठी आरक्षित असल्याने व जागेचा परिसर विशेष औद्योगिक विभाग (आय-३) मध्ये समाविष्ट असल्याने विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. ९, टेबल क्र. ४ खालील तळटीप क्र. (iv) नुसार क्रिडांगणाच्या/ मनोरंजनाच्या मैदानाच्या १०% क्षेत्रावर एकूण क्षेत्राच्या १५ टक्के बांधकाम तत्सम उपयोगासाठी अनुज्ञेय राहील. विषयांकित जमिनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार टीडीआर अनुज्ञेय नाही. संरक्षणपात्र अतिक्रमणधारकांचे नियम क्र. ३.११ खाली अन्यत्र स्थलांतरण / पुनर्वसन केल्यावर नियमाच्या तरतुदीनुसार टीडीआर अनुज्ञेय होऊ शकेल.

६) राज्य क्रिडा धोरणांतर्गत क्रिडा सुविधा संकुल उभारण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा क्रिडा संकुलाची उभारणी करणे आवश्यक आहे.

७) सदर प्रकल्प अत्यावश्यक नागरी प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला असल्याने विषयांकित जमिनीवरील संरक्षणपात्र अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनाबाबत कार्यवाही झाल्यानंतर क्रिडा संकुलाचे काम हाती घेण्यात यावे.

सही/-
**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा**

प्रति,
जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती, मुंबई उपनगर जिल्हा,
शासकिय शारीरिक शिक्षण महाविद्यालय परिसर,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व, मुंबई.

**प्रत :**

१) उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी अग्रेषित
२) उपसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीसाठी अग्रेषित
३) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना यांना माहितीसाठी अग्रेषित
४) नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
५) तहसिलदार अंधेरी यांना माहितीसाठी रवाना.

स्थळ प्रतवर जिल्हाधिकारी यांची सही असे

COLLECTOR OF ... DISTRICT (जिल्हाधिकारी)

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

D.\3c\F247.doc

D.\3c\F